जिल्हा परिषद, रायगड

**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

**(निविदा सुचना नं. २३ सन २०२६-२७)**

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचेकडील खालील कामांची निविदा योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यांत येत आहेत. तरी खालील निविदाबाबतची सर्व माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी (जीएसटी सह) | वर्गवारी | आवश्यक कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **पहिले बोलावणे** | | | | | | | |
| १ | ग्रामपंचायत अंभेरपाडा हद्दीतील मौजे बेलाचीवाडी येथे गाबरीच्या ओहळयालगत संरक्षण भिंत बांधणे ता.कर्जत | पुर नियंत्रण प्रकल्प (४७११-२८५६) सन २०२५-२६ | १९६६४५४/- | १९६६४/- | ११८०/- | वर्ग- ०५ अ त्यावरील | जि. प. रायगड कडील वैध वर्गातील खुला कंत्राटदार |
| २ | बेलवडे बु.ग्रामपंचायत हद्दीतील राठीचीवाडी येथे नाल्याला पुर सरंक्षण भिंत बांधणे ता.पेण | पुर नियंत्रण प्रकल्प (४७११-२८५६) सन २०२५-२६ | २४५६२८७/- | २४५६२/- | ११८०/- | वर्ग- ०५ अ त्यावरील | जि. प. रायगड कडील वैध वर्गातील खुला कंत्राटदार |
| ३ | ताडवागळे येथे नाल्याला संरक्षण भिंत बांधणे ता.अलिबाग | पुर नियंत्रण प्रकल्प (४७११-२८५६) सन २०२५-२६ | २९४०६९५/- | २९४०६/- | ११८०/- | वर्ग- ०५ अ त्यावरील | जि. प. रायगड कडील वैध वर्गातील खुला कंत्राटदार |
| ४ | विर्तसारळ येथे नाल्याला संरक्षण भिंत बांधणे ता.अलिबाग | पुर नियंत्रण प्रकल्प (४७११-२८५६) सन २०२५-२६ | २९४०८८८/- | २९४०८/- | ११८०/- | वर्ग- ०५ अ त्यावरील | जि. प. रायगड कडील वैध वर्गातील खुला कंत्राटदार |
| ५ | मौजे येलवणे येथे नाल्याला संरक्षण भिंत बांधणे ता.अलिबाग | पुर नियंत्रण प्रकल्प (४७११-२८५६) सन २०२५-२६ | २९४०२४०/- | २९४०२/- | ११८०/- | वर्ग- ०५ अ त्यावरील | जि. प. रायगड कडील वैध वर्गातील खुला कंत्राटदार |
| ६ | ग्रामपंचायत खरोशी हद्दीतील खरोशी येथील नदीला पुर संरक्षण भिंत बांधणे | पुर नियंत्रण प्रकल्प (४७११-२८५६) सन २०२५-२६ | २४५४१५८/- | २४५४१/- | ११८०/- | वर्ग- ०५ अ त्यावरील | जि. प. रायगड कडील वैध वर्गातील खुला कंत्राटदार |
| ७ | मौजे विन्हेरे बागआळी येथे नदीला संरक्षण भिंत बांधणे ता.महाड | पुर नियंत्रण प्रकल्प (४७११-२८५६) सन २०२५-२६ | ४९१४४४२/- | ४९१४४/- | ११८०/- | वर्ग- ०५ अ त्यावरील | जि. प. रायगड कडील वैध वर्गातील खुला कंत्राटदार |

- **वरील कामाची संपुर्ण माहिती शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १४/०५/२०२६ रोजी १०.०० वाजलेपासून ते दि.२८/०५/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यत उपलब्ध आहे, यादरम्यान निविदा भरता व डाऊनलोड करता येतील.**

- **निविदेचे वेळापत्रक -**

| तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| संकेतस्थळावरुन ई- निविदा प्रसिध्दी व डाऊनलोड करणेचा कालावधी | दि. १४/०५/२०२६ पासून | १०.०० |
| | दि. २८/०५/२०२६ पर्यंत | १७.०० |
| ई- निविदा सादर करणेचा अंतिम कालावधी | दि. २८/०५/२०२६ पर्यंत | १७.०० |
| ई- निविदा उघडणेची वेळ व तारिख | दि. २९/०५/२०२६ नंतर (कार्यालयीन सोयीनुसार) | १७.०० |
| ई- निविदा उघडणेसाठी प्राधिकृत केलेले अधिकारी | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप- अलिबाग | |
| | मा. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग राजिप | |
| | मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, राजिप,अलिबाग | |

**निविदेच्या अटी व शर्ती -**

१. वरील कामाची निविदा फी (Tender Fee) व इसारा रक्कम (EMD) ही शासनाचे वरील **www.Mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर आपले लॉगीन दवारे भरणेची सुविधेनुसार भरणा करावी व त्याची PDF प्रत तांत्रिक लिफाफयात अपलोड करावी.

२. जि. प. रायगड यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार **खुला** नोंदणी प्रमाणपत्राची मूळप्रत (Registration Copy) निविदेसोबत अपलोड करावी.

३. या प्रकारचे निविदा किमतीच्या किमान ३०% इतक्या किमतीचे कामे कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्थेकडे मागील तीन वर्षात पुर्ण केलेले अथवा हाती घेतलेले आणि संबंधित संस्थेच्या सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेल्या काम पुर्णत्वाचा किंवा कार्यारंभ आदेशाची प्रत तांत्रिक लिफाफयात अपलोड करावी.

४. निविदाधारकाने पॅनकार्ड व आधारकार्ड यांची स्कॅनप्रत तांत्रिक लिफाफयात अपलोड करावी.

५. GST CERTIFICATE ORIGINAL COPY (स्कॅन) प्रत निविदेसोबत सादर करावी.

६. निविदाधारकाने सदर योजनेच्या अंमलबजावणीचे कामाचे ठिकाणी स्वत: जावून नैसर्गिक परिस्थीतीचा आढावा घेणे गरजेचे आहे. व तदनंतर सदरील काम करणेची स्वत: ची खात्री पटल्यानंतरच निविदा सादर करावी.

७. सदरील कामाचा आर्थिक लिफाफा उघडलेनंतर L१ निविदाधारकांने ०७ दिवासात विहित नमुन्यात करारनामा करुन घेणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केलेस संबंधित L१ निविदाधारकावर कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

८. निविदा प्रपत्रातील Declaration of the contractor विहीत नमुन्यातील कंत्राटदाराचे रु. ५००/- च्या बॉड (Bond) पेपरवर स्कॅनप्रत अपलोड करावी.

९. वित्त विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. GST१०१७/प्र.क्र.८१/कराधान१ मंत्रालय, मुंबई दि. १९/०८/२०१७ मधील मुददा क्र. १ नुसार निविदा सादर करताना दि. ०१/०७/२०१७ नंतर लागू झालेल्या GST कराच्या बोज्याचा विचार करुनच कंत्राटदराने निविदा सादर करणे अनिवार्य आहे.

१०. बांधकाम व इतर कामाचे मजुर (रोजगार नियमन व सेवेच्या शर्ती) अधिनियम १९९६ व त्याखालील बनविण्यात आलेल्या विविध नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील. इमारत व इतर बांधकाम मजुराचे कल्याण सेस नियम १९६८ मधील नियमांचे पालन करावे.

११. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. बीजीडी-२०१६/प्र.क्र./इमा-२ मंत्रालय मुंबई यांचे दि. १२/०२/२०१६ मधील मार्गदर्शक सुचनेनुसार प्राप्त निम्नतम निविदेच्या देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १% ते १०% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या १% एवढया रकमेच्या धनाकर्ष (Demand Draft) (मुख्य लेखा व वित्ताधिकारी, राजिप) यांचे नावे परॅफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून या कार्यालयात सादर करावा लागेल. (उदा १% ते १०% कमी दर १% रक्कम)

१२. ठेकेदाराने कामावर आलेल्या मजुरांची यादी ई-निविदेसोबत जोडणेत यावी तसेच कामावर आलेल्या सर्व मजुरांचा काम सुरु करण्यापुर्वी विमा काढण्यात यावा. अन्यथा प्रत्यक्ष काम करतेवेळी मजुर कर्मचारी अनावधानाने अपघात व दुखापत, मृत्यु झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल. त्यासाठी जिल्हा परिषद मार्फत कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

१३. या कामासाठी आलेल्या निविदापैकी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रदद करणेचे अधिकार निविदा समितीने राखून ठेवण्यात आले आहेत आणि निविदा सादर करणा-या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला (निविदा) रदद केल्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.

१४. शासन निर्णय दि. १७/०३/२०१० नुसार १००% घरगुती नळजोडणी अनिवार्य राहील. योजना पुर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराने किमान एक वर्ष योजना चालवणे बंधनकारक राहिल त्यानंतर सदर योजनेची प्रतिभुर्ती देण्यात येईल.

१५. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सीएटी२०१८/प्र.क्र.१२७/इमा२ मंत्रालय मुंबई दि. २८/११/२०१८ नुसार निविदेसोबत सादर करण्यात आलेली कागदपत्रे खोटी आढळून आल्यास भारतीय दंड विधान संहितेच्या कलम अंतर्गत संबधित कंत्राटदाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणेत येईल याची सर्वस्वी जबाबदारी ऑनलाईन खोटी कागदपत्रे सादर करणारे कंत्राटदार यांची असेल याची नोंद घ्यावी.

१६. निधी उपलब्धतेनुसार व वितरणानुसार देयक अदा केले जाईल याची नोंद घ्यावी.

१७. मा. जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती सभा दिनांक ०७/१०/२०२० चे निर्णयानुसार, सदरील काम विहीत मुदतीत पुर्ण न झाल्यास वरील कामास पहिले सहा महिनेचे मुदतवाढीस प्रति दिन रु. ५००/- इतका दंड आकारणेत येईल व तदनंतरचे मुदतवाढीकरीता सदरील दर दुप्पट करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१८. ऑनलाईन निविदा सादर केल्यानंतर, निविदाधारकास लेखी पत्र देऊन निविदेतुन माघार घेता येणार नाही. निविदाधारकाने असे केल्याचे दिसून आलेस संबंधित निविदाधारकाचे सुरक्षा अनामत/इसारा रक्कम जप्त करणेची कार्यवाही करणेत येईल याची निविदाधारकाने गंभीर नोंद घ्यावी.

१९. वर नमुद निविदा कोणत्याही क्षणी रदद करणेचे तसेच मंजुर/ नामंजुरीचे अधिकार निविदा समितीने राखून ठेवले असून ते निविदाधारकावर बंधनकारक राहतील व याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

२०. वरील सर्व अटी व शर्ती निविदाधारकास मान्य असल्याने त्याने निविदा सादर केली आहे असे गृहीत धरले जाईल.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| कार्यकारी अभियंता | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, राजिप | रायगड जिल्हा परिषद अलिबाग | रायगड जिल्हा परिषद अलिबाग |

Signature Not Verified

Digitally signed by SANGEETA KISHOR PATIL
Date: 2026.05.15 02:21:51 IST
Location: Maharashtra-MH